# ग्रामपंचायत कार्यालय ढकांबे

## ता. दिंडोरी जि. नाशिक

ग्रामपंचायत कार्यालय ढकांबे ता.दिंडोरी,जि.नाशिक

दि: १२/११/२०२४

**नवीन इमारत बांधकाम परवाना**

श्री. सुधिर निवृत्ती केदार,
रा.ढकांबे ता. दिंडोरी,
जि. नाशिक.

**विषयः- नवीन इमारत बांधकाम करणेसाठी परवानगी देणे.**

ग्रामपंचायतीकडे तुम्ही ढकांबे येथील ग्रामपंचायत हद्दीतील नगर भूमापन क्र. २०४ व २०५ क्षेत्र २४२.३० चौ.मी. मध्ये निवासी प्रयोजनासाठी नवीन आर.सी.सी इमारत बांधकाम करण्यासाठी परवानगी मागितलेली आहे. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम ५२ अन्वये व महाराष्ट्र ग्रामपंचायत नियम १९६७ मधील तरतुदीनुसार व वाचले क्र.२ व २ नुसार नवीन इमारत बांधकाम करण्यासाठी खालील अटी-शर्ती वर परवानगी देण्यात येत आहे.

**बांधकामाचे ठिकाण:- नगर भूमापन क्र.२०४ व २०५**
**इमारत बांधकामाचे मंजूर क्षेत्रफळः- २३७ चौ.मी.**
**इमारत बांधकामाचे प्रायोजन :- निवासी**

**अटी व शर्ती:-**

१) भूखंडाचे उपअधिक्षक भूमीअभिलेख दिंडोरी कार्यालयाकडून प्रथम मोजणी करून घ्यावी, मोजणी केल्याच्या नकाशाची एक प्रत ग्रामपंचायतीला सादर केल्यानंतर बांधकामाला सुरुवात करावी.
२) इमारत बांधकामाचे सादर केलेले नकाशे सर्वसाधारणपणे बरोबर आहेत.
३) भूखंडाचे समोरील व पाठीमागच्या बाजूने १ मीटर खुली / मोकळी जागा ठेवाबी.
४) राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग, मुख्य जिल्हा रस्ता, इतर जिल्हा रस्ता यांचेजवळ भूखंड असल्यास त्या रस्त्याच्या नियंत्रण रेषा त्या-त्या वेळी अंमलात असलेल्या विधी अथवा विहित आदेशानुसारच्या मानकानुसार राहील. त्याबाबतचे नाहरकत दाखला संबंधित कार्यालयाकडून घेऊन नंतर बांधकाम सुरु करावे.
५) इमारत बांधकाम परवानगी मागणारा अर्जदार/मालक हा भूखंडांचा निर्वेध मालक असेपर्यंतच इमारत बांधकाम करता येईल.
६) इमारत बांधकाम परवानगी बांधकामाचे एकूण क्षेत्र २३७ चौ. मी. एवढ्या क्षेत्रासाठी देण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| (श्री. आर. बी. राख) | सरपंच |
| ग्रामपंचायत अधिकारी | ग्रामपंचायत ढकांबे |
| ग्रामपंचायत-ढकांबे | ता. दिंडोरी, जि. नाशिक |
| ता. दिंडोरी, जि. नाशिक | |

७) इमारतीचे बांधकाम जोतेपर्यंत / प्लीथ बांधकाम पूर्ण झालेनंतर बांधकाम इंजिनीअर / आर्कीटेक्चर यांचेकडून मंजूर नकाशाप्रमाणे बांधकाम बरोबर असल्याचे प्रमाणपत्र घेतल्यानंतर पुढील बांधकाम सुरु करावे. व त्याची प्रत ग्रामपंचायतीला सादर करावी.

८) महाराष्ट्र लैंड रेव्हेन्यू कोड व महाराष्ट्र टाऊन प्लॅनिंग ॲक्ट नुसार आवश्यक त्या परवानग्या मा. जिल्हाधिकारी व संबंधित कार्यालयाकडून घेण्यात याव्यात.

९) इमारत बांधकाम नकाशा हा परवानगी पत्रातील अटी शर्तीनुसार असणे बंधनकारक आहे.

१०) इमारत बांधकामाचा "एफएस आय १.५ हा देण्यात येत आहे.

११) इमारतीचा समोरील दर्शनी भाग आकर्षण व सुबक ठेवावा.

१२) इमारतीमध्ये आवश्यकतेनुसार स्नानगृहे व शौचालये बांधकामे करावीत ते बंधनकारक आहे.

१३) इमारतीचे बांधकाम "धार्मिक प्रयोजनार्थ" असल्यास पोलिस विभागाचे नाहरकत प्रमाणपत्र घेऊन नंतरच इमारत बांधकाम सुरु करावे, ते घेतले नसल्यास ग्रामपंचायतीने दिलेली परवानगी रद्द समजण्यात यावी.

१४) इमारत बांधकामाची मुदत बारा महिने पर्यंत देण्यात येत आहे.

१५) ग्रामपंचायतीने वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे पालन करण्यात यावे.

१६) मिळकत धारकाने / अर्जदाराने भूखंडाचे क्षेत्रात वाहनतळाची व्यवस्था करावी. रस्त्यावर वाहन पार्किंग करता येणार नाही.

१७) तळाला, हवाई, शेजारील मिळकतीत, सरकारी व सार्वजनिक जमिनीवर मालमत्तेवर अतिक्रमण करू नये.

१८) बांधकामाच्या ठिकाणी साहित्य सामुग्री वाहतूक करतांना सार्वजनिक रस्त्यांची, गटारीची व पाईप लाईनचे व सरकारी मालमत्तेचे नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी.

१९) बांधकामाचे साहित्य सार्वजनिक मालमत्ता, रहदारीचा रस्ता व गटारीवर ठेवण्यात येऊ नये.

२०) भूखंडाच्या क्षेत्रातील इमारतीचा वापर करणाऱ्या व्यक्तीच्या दुप्पट वृक्ष लागवड करून संगोपन करणे.

२१ ) इमारतीवर सौर उर्जेचा वापर जास्तीत जास्त करावा.

२२) इमारत बांधकामास दिलेल्या मुदतीत बांधकाम पूर्ण न झाल्यास वेळीच मुदतवाढ करून घ्यावी.

२३) इमारत बांधकाम पूर्ण झाल्यावर घरावर पडणारे पावसाचे पाणी संकलित करण्यासाठी रुफ टाप रेन वाटर हार्वेस्टींगचा समावेश करावा.

२४) पावसाचे पाण्यासाठी व सांडपाण्यासाठी स्वतंत्र मार्ग ठेवावा. सांडपाणी बांधकाम केलेल्या गटारीत सोडावे किंवा शोषखड्डा तयार करून शास्त्रीय पद्धतीने विल्हेवाट लावावी,

२५) ही परवानगी तळमजला, पहिला मजला, दुसरा मजला व तिसरा मजला बांधकाम करण्यासाठी देण्यात येत आहे.

२६) इमारत बांधकाम हे जिवितास धोकेदायक नसावे ते आरोग्यास हितकारक असावे.

२७) इमारतीचे बांधकाम मुदतीत पूर्ण केल्यानंतर, अंतिम मंजूर नकाशाप्रमाणे बांधकाम पूर्ण केले बाबतचे इंजिनीअर व आर्कटिक्चर यांचे प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करावा. काम पूर्णत्वाचे अंतिम प्रमाणपत्र ग्रामपंचायतीने दिल्याशिवाय इमारतीचा भोगवटा वापर सुरु करू नये.

२८) इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर वीज जोडणी, पाण्याचे नळजोडणी व इतर नाहरकत प्रमाणपत्र देण्यात येतील.

(श्री. आर. बी. राख)
ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत - ढकांबे
ता. दिंडोरी, जि. नाशिक

सरपंच
ग्रामपंचायत ढकांबे
ता. दिंडोरी, जि. नाशिक

२९) इमारतीचे बांधकाम मुदतीत मंजूर आराखड्याप्रमाणे पूर्ण करूनही ग्रामपंचायतीकडे नोंदणी न करताच भोगवटा / वापर सुरु केल्यास सदर इमारतीला शासन नियमाप्रमाणे वार्षिक कर आकारणी होणाऱ्या रक्कमेच्या दुप्पट रक्कम एवढी दंडाची रक्कम प्रती महिना सम प्रमाणात वसूल करण्यात येईल.

३०) मंजूर केलेली बांधकाम परवानगी सुधारित करून घ्यावयाची असल्यास मंजूर बांधकाम नकाशे सुधारित करण्याची कारणे अर्जात नमूद करणे आवश्यक राहील.

३१) नैसर्गिक आपत्ती व इतर आपत्तीच्यावेळी इमारतीत प्रवेश करता येईल अशीही इमारतीची रचना करावी.

३२) परवानगी दिल्यापासून एक वर्षाच्या आत बांधकाम सुरु न केल्यास दिलेली बांधकाम परवानगी रद्द होईल.

३३) इमारत बांधकाम पूर्ण झाल्यावर शासन नियमाप्रमाणे केलेली कर आकारणी व कर भरणे तुमच्यावर बंधनकारक राहील.

३४) शेजारील मिळकतींचे नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी. व उघड्यावर टाकाऊ पदार्थ व वस्तू टाकून परिसर प्रदूषित करू नये.

३५)वरील अटी शर्तीचे उल्लंघन केल्यास व शेजारील नागरिकांनी या कार्यालयाकडे / वरिष्ठ कार्यालयाकडे / न्यायालयाकडे बाद / तक्रार केल्यास बांधकाम परवानगी रद्द करण्यास पात्र राहील.

ठिकाण : ढकांबे

दिनांक १२/११/२०२४

(श्री. आर. बी. राख)
ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत-ढकांबे
ता. दिंडोरी, जि. नाशिक

सरपंच
ग्रामपंचायत ढकांबे
ता. दिंडोरी, जि. नाशिक